# (ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया)

## Only First Year MBBS (OPEN/EWS Students)

## Rajarshri Chhatrapati Shahu Maharaj Scheme

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज योजना

## ( Income should be less than or equal to 8.00 Lacs. )

First Year - MBBS विद्यार्थ्यांनी गतवर्षी इयत्ता अकरावी/बारावी मध्ये असताना जर MAHA-DBT पोर्टलवर शिष्यवृत्ती/फ्रीशिप किंवा इतर योजनांचे अर्ज सादर केलेले असतील तर, त्यांनी New Application Registration करु नये. अशा विद्यार्थ्यांनी पूर्वीचाच User id आणि Password चा उपयोग करुन अर्ज भरणे.

**((( किंवा )))**

User id आणि Password तयार केलेला नसेल तर **MAHA-DBT** पोर्टलवर New Application Registration करुन User id आणि Password तयार करुन घेणे आणि Log-in करणे, त्यानंतर विद्यार्थ्यांना " Do You Have Aadhaar Number ? " असा प्रश्न विचारण्यात येईल. तेव्हा विद्यार्थ्यांनी "Yes" पर्यायावर क्लिक करुन Aadhar Registration करायचे आहे. ( **विद्यार्थ्यांनी Non Aadhar/Biometric नोंदणी करु नये** ) यासाठी विद्यार्थ्यांकडे स्वतःचे आधार कार्ड असणे अनिवार्य आहे. आणि विद्यार्थ्यांचे आधार कार्ड त्यांनी वापरत असलेल्या सक्रिय मोबाईल क्रमांकाला आणि त्यांच्या स्वतःच्या बँक खात्याला संलग्न (Link) असने अनिवार्य आहे.

**((( त्यानंतर खाली नमुद केल्याप्रमाणे Profile मध्ये जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करने. )))**

↓

## Personal information

Personal information मध्ये विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम स्वतःच्या चालु Mobile Number & Email ID ची नोंद करणे अनिवार्य राहील, यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या अर्जाच्या सद्यःस्थिती बाबत वेळोवेळी **MAHA-DBT** कडून SMS/Email ID च्या माध्यमातून सूचना प्राप्त होतील.

**i) Income Certificate** - विद्यार्थ्यांनी त्यांच्या कुटुंबाचे सर्व स्त्रोतांद्वारे मिळणारे वार्षीक उत्पन्न विचारात घेणे अनिवार्य आहे. तसेच, विद्यार्थ्यांचे पालक महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी असतील तर त्यांनी Assessment Year 2024-25 चे (म्हणजेच आर्थिक वर्ष २०२३ - २४ चे) Form No. 16 - Part – B मधील Gross Salary जितकी असेल तितक्याच Gross Salary एवढे , पण तहसीलदार कार्यालयाकडून निर्गमित झालेले **आर्थिक वर्ष २०२३ - २४** चे उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्र स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य राहील. **किंवा** ज्या विद्यार्थ्यांचे पालक स्वयंरोजगार/स्वयंव्यवसाय/खासगी नोकरी करत असतील अशा विद्यार्थ्यांनी देखील तहसीलदार कार्यालयाकडून निर्गमित झालेले **आर्थिक वर्ष २०२३ - २४** चे उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्र स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य राहील. **(Income certificate Xerox अपलोड करु नये)**

**Note** - उत्पन्नाचे प्रमाणपत्र पालकांच्या प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा कमी आढळून आल्यास/बोगस आढळून आल्यास संबंधीत पालकांविरुध्द, शासनाची आर्थिक फसवणूक केल्याबद्दल नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

iii) **Original Domicile certificate** स्कॅन करुन अपलोड करणे.

iv) **Bank Details** मध्ये Bank account & IFS code ची नोंद करणे आवश्यक नाही, परंतु विद्यार्थ्यांचे आधार कार्ड त्यांच्या बँक खात्याला संलग्न (Link) असने अनिवार्य आहे.

## Address information

Address information मध्ये विद्यार्थ्याच्या आधार कार्ड वरील पत्ता आपोआप अद्ययावत (Update) झालेला दिसेल.

## Other information

Other information मध्ये Parent's/Guardian's Details सादर करणे.

## Current Course

Current Course मध्ये विद्यार्थ्यांनी MBBS कोर्स प्रवेशाबाबत संपूर्ण माहीती सादर करावयाची आहे. उदा. Admission Year In Current Course – 2024, Qualification Level – Under Graduate Course, Stream – Health Science, Admission Type – CAP/Govt. Quota इत्यादि माहीती सादर करावयाची आहे. त्यानंतर **Cap ID** म्हणुन ऑनलाईन प्राप्त झालेले **Provisional Selection Letter/College Allotment Letter** अपलोड करने अनिवार्य आहे. ( Cap ID म्हणुन Neet Exam Result/Neet Application Form/Admit Card/Document Verification Acknowledgement/Retention अपलोड करु नये ). त्यांनतर विद्यार्थ्यांनी Year of Study मध्ये जाऊन First Year हा पर्याय निवडूण पुढे First Year Pursuing हा पर्याय निवडणे. त्यानंतर Admission Date (First Year) – यामध्ये महाविद्यालयाच्या CET Cell कडून प्राप्त झालेल्या Office Order वरील दिनांक Admission Date म्हणून टाकावे. त्यानंतर विद्यार्थ्यांनी **Fees Paid** या पर्यायामध्ये रु. **"शुन्य (Zero)"** ही रक्कम नोंद करावी. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षाचे Bonafide certificate अपलोड करावे. Mode – Regular करणे.

## Past Qualification

Past Qualification मध्ये 10th & 12th अभ्यासक्रमाची माहिति सादर करावयाची आहे. Was any Gap in this Qualification/course ? 12th अभ्यासक्रमानंतर गॅप असेल तर, त्याचप्रमाणे गॅप प्रमाणपत्र अपलोड करण्याचा पर्याय उपलब्ध असल्यास Original गॅप प्रमाणपत्र अपलोड करणे.

## Hostel Details

विद्यार्थ्यांनी, **Hostel Type – Non Govt.** दाखवून चालू शैक्षणिक वर्षाचे महाविद्यालयाचे मूळ वसतिगृह प्रमाणपत्र (Original Hostel Certificate) स्कॅन करुन अपलोड करणे. **(वसतिगृह शुल्काची पावती अपलोड करु नये)**

**किंवा**

विद्यार्थी भाडेतत्त्वावर/किरायाने (Rent) रहात असेल तर **Hostel Type – Rented House** दाखवून रु. १००/- च्या बॉण्डवर चालू शैक्षणिक वर्षाचे शपथपत्र (भाडे करारनामा) ॲफिडेव्हिट/नोटरी करुन अपलोड करने.

**किंवा**

जे विद्यार्थी फक्त राजर्षी छत्रपती शाहु महाराज योजनेचे अर्ज भरणार असतील अशा विद्यार्थ्यांनी **Hostel Details** मध्ये **Day Scholar** अशी नोंद करणे.

↓

त्यानंतर सर्वात शेवटी **All Schemes** मध्ये जाऊन **Directorate of Medical Education and Research** या विभागाची निवड करावी व **Rajarshri Chhatrapati Shahu Maharaj Fee Reimbursement Scheme** या योजनेची निवड करावी. **Scheme** ची निवड केल्यानंतर विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे **Additional Questions** विचारण्यात येतील.

i) Is this a Renewal Application – No करणे.
ii) Upload Father/Guardians PAN Card **(Compulsory)**
iii) Upload Father/Guardians Aadhaar Card **(Compulsory)**
iv) Upload Mother/Guardians Aadhaar Card **(Compulsory)**
v) Upload Students Aadhaar Card **(Compulsory)**
vi) Upload Mother PAN Card (Optional)
vii) Upload Students PAN Card (Optional)

**वरील प्रमाणे पॅन कार्ड आणि आधार कार्ड अपलोड केल्यावर सर्वात शेवटी अर्ज SAVE करुन SUBMIT करणे अनिवार्य आहे, त्यानंतर विद्यार्थ्यांना Scheme Successfully Apply केल्याचा SMS येईल, तेव्हाच ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.**

**त्यानंतर विद्यार्थ्यांनी My Applied Scheme मध्ये जाऊन View Form मध्ये जाणे आणि अर्जाची प्रिंट घेणे आणि खालीलप्रमाणे विहित नमुन्यातील अर्ज ( Application to Dean ) लिहून अर्जावर नमुद केलेली कागदपत्रे क्रमाने अर्जासोबत जोडून कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.**

↓

प्रथम वर्ष **MBBS** साठी विहित नमुन्यातील अर्ज ( Application to Dean )

दिनांक :-

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जालना.

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज योजना मंजूर करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी सविनय अर्ज करतो/करते की, मी आपल्या महाविद्यालयात प्रथम वर्ष MBBS या अभ्यासक्रमात शिक्षण घेत आहे.

मी राजर्षी छत्रपती शाहू महाराज योजनेसाठी महाराष्ट्र शासनाच्या MAHA-DBT पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला असून, अर्ज सादर करतेवेळी अत्यावश्यक असलेली सर्व मुळ (Original) प्रमाणपत्रे स्पष्ट दिसतील अशाप्रकारे अपलोड केलेली आहे.

त्याचप्रमाणे अर्जात नमूद केलेली कौटुंबीक उत्पन्नाची माहिती, इतर माहिती योग्य आहे, त्याचप्रमाणे अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे ही मूळ कागदपत्रांच्याच सत्यप्रती आहेत, जर ही माहिती
खोटी आढळल्यास त्यास मी पुर्णतः जबाबदार असेन, त्यासाठी भा.दं.वि.कायदा कलम १९९ व २०० नुसार लागु होणा-या शिक्षेस मी पात्र राहील, याची मला पुर्ण जाणीव आहे.

करीता माझा अर्ज मंजूर करावा ही नम्र विनंती...

आपला/आपली आज्ञाधारक
Sign,-
Name -
Admission Year –
Roll No. -

सोबत :- Self Attested Documents

१) ऑनलाईन अर्जाची प्रिंट - हार्डकॉपी (Hard Copy)
२) अधिवास प्रमाणपत्र (Domicile certificate) - Xerox
३) EWS Certificate - Xerox (केवळ EWS प्रवर्गातुन प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी)
४) विद्यार्थ्याचे आधार कार्ड - Xerox
५) पालकाचे आधार कार्ड - Xerox
६) पालकाचे पॅन कार्ड - Xerox
७) आर्थिक वर्ष २०२३ - २४ चे एक वर्षाचे मुळ उत्पन्न प्रमाणपत्र (**Original Income** )
(तहसील कार्यालयातून निर्गमीत केलेले.)
**टीप :- तीन वर्षाचे उत्पन्न अपलोड करु नये व अर्जासोबत जोडू नये.**
८) गतवर्षी पास झालेल्या परिक्षेच्या गुणपत्रिका - Xerox ( Last Year Marksheet )
उदा. १० वी, १२ वी
९) गॅप असेल तर रु. १०० च्या बॉण्ड पेपर वर गॅप बाबत शपथपत्र.- Xerox
१०) CAP id (Provisional Selection Letter/College Allotment letter - Xerox
११) First Year Bonafide Certificate - Xerox
१२) कॉलेज Office order आणि Holding Certificate - Xerox